# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे**
**कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे**
**दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१**
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-१९०** **दिनांक- १७/०५/२०२४.**

## भिंतीस भगदाड पाडून रात्री घरफोडी करणाऱ्या सराईत गुन्हेगारास भाईंदर पोलीस ठाणेकडून अटक

भाईंदर पोलीस ठाणे येथे दाखल गुन्हा रजि क्र. १७०/२०२४ भा.द.वि.स. कलम ३८०, ४५४, ४५७, ४११ प्रमाणे गुन्हा नोंद असुन गुन्हयाची हकीगत अशी की, दि. २६/०४/२०२४ रोजी २२.०० वा. ते दि.२७/०४/२०२४ रोजी सकाळी १०.०० वा. सुमारास कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे दुकानाचे मागील भिंत तोडुन त्यावाटे आत प्रवेश करुन अंदाजे रु.२,६१,४५१/- रुपये किंमतीचे नवीन मोबाईल, वॉच, ब्लु टुथ, रिपेंअरींगसाठी आलेले जुने मोबाईल तसेच गल्ल्यातील रोख रक्कम दुकान फोडून चोरी करुन नेले आहेत म्हणून अज्ञात चोरट्याविरुध्द तक्रार दिल्याने सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हा हा रात्रौ घरफोडीचा गंभीर स्वरुपाचा असल्याने मा. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे नमुद गुन्हयाचा तपास सुरु करण्यात आला होता. तपासा दरम्यान गुन्हयाच्या घटनास्थळाला भेट देवुन गुन्हयाच्या घटनास्थळाचे, तसेच घटनास्थळाकडे येणाऱ्या-जाणाऱ्या रस्त्याचे उपलब्ध सीसीटीव्ही कॅमेरांचे फुटेज तपासले असता, त्यात एक संशयित इसम दिसुन आला. त्याचे रुट सीसीटीव्ही फुटेज घेऊन त्याचे फोटोग्राफ प्राप्त केले. सदरचे फोटो खास खबरींना दाखविले असता सदर आरोपीचे नाव तपस ऊर्फ टायसन असून तो डंक्कन रोड, फुटपाथ, मुंबई परिसरातील फिरस्ता असल्याचे निष्पन्न झाले होते. त्याबाबत वरीष्ठांना कळवून सदर ठिकाणी सापळा रचुन दोन दिवस पाळत ठेवून शिताफिने ताब्यात घेवून त्यास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव तपस ऊर्फ टायसन जुगलचंद उरवी, वय ४२ वर्षे रा. दोन टाकी, डंक्कन रोड, फुटपाथ, मुंबई असे सांगितले. त्यास गुन्हयाचे अनुषंगाने तपास केला असता त्याचा सदर गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास वर नमुद गुन्हयात दि. ३०/०४/२०२४ रोजी अटक करण्यात आली आहे. अटक आरोपी याचेकडे पोलीस कोठडी दरम्यान तपास केला असता त्याने गुन्हयात चोरी केलेले रिपेअरींग करीता आलेले जुने मोबाईल फोन व स्मार्ट वॉच हे त्याने मुंबईतील चोर बाजारात विक्री करीता दिले होते. तसेच नवीन मोबाईल फोन हे आरोपी नामे अब्दुल रहीम खलील शेख रा. मुसाफिर खाना मजिद बंदर मुंबई याला विकले होते. सदर आरोपीने ते कोलकाता येथे विक्रीकरीता त्याचे भावाचे नावे कुरीयर ने पाठविले होते. गुन्हयात चोरीस गेलेले ३५ मोबाईल्स फोन, ७ स्मार्ट वॉच, असा एकूण २,३२,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात भाईंदर पोलीस गुन्हे प्रकटीकरण कक्षास यश आले आहे. अटक दोन्ही आरोपी हे सध्या न्यायालयीन कस्टडीमध्ये असुन नमुद गुन्हयाचा पुढील तपास पोउनि/प्रसाद गोवले हे करीत आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ ०१, दिपाली खन्ना, सहायक पोलीस आयुक्त, भाईंदर विभाग, सुर्यकांत नाईकवाडी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, भाईंदर पोलीस ठाणे, विवेक सोनवणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक श्री माणिकराव कतुरे, पोउनि/प्रसाद गोवले, पोहवा-/रविंद्र भालेराव, राजेश श्रीवास्तव, किरण पी. पवार, किरण आर. पवार, सुशिल पवार, पोना/रामनाथ शिंदे, पोशि-संजय चव्हाण, सलमान पटवे, जयप्रकाश जाधव नेम परिमंडळ १ कार्यालय यांनी केलेली आहे.

--------------ooooo-------------